# रायगड जिल्हा गॅझेटिअर ई-बुक आवृत्ती

रायगड जिल्हा गॅझेटिअरची ई-बुक आवृत्ती काढताना मनापासून आनंद होत आहे. मुळात कुलाबा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर ब्रिटिश काळामध्ये १८८३ मध्ये प्रकाशित झाले. जेम्स एम कॅम्बेल याने संपादित केलेला हा ग्रंथ विभागाने पुनर्मुद्रित केला. तसेच स्वातंत्र्यानंतर या जिल्ह्याची सुधारित आवृत्ती कुलाबा जिल्हा गॅझेटिअर १९६४ मध्ये प्रकाशित झाले. तर रायगड जिल्हा गॅझेटिअर हे मराठीतून १९९३ मध्ये प्रकाशित करण्यात आले.

स्वातंत्र्यपूर्व काळात या जिल्ह्यात असलेले जंजीरा संस्थान व भोर संस्थानातील काही भाग या जिल्ह्यात आला, नंतर तालुक्यांची पुनर्रचना झाली. शासनाने १ मे १९९१ रोजी कुलाबा जिल्ह्याचे नामांतर रायगड जिल्हा असे केले.

या विभागाने पूर्व प्रकाशित सर्व जिल्हा व राज्य गॅझेटिअरचे ई-बुक तयार केले असून शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra.gov.in)** अधिकृतपणे उपलब्ध करून देण्यात आले आहे. रायगड जिल्ह्याचे मराठी गॅझेटिअर (दर्शनिका) ई-बुक स्वरूपात देत असताना रायगड जिल्ह्याचा नकाशा व २००१ च्या जनगणने आधारे ‘ जिल्हा दृष्टिक्षेपात ’ हे परिशिष्ट देत आहे. याकामी सतत प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणाऱ्या सर्व संपादक मंडळ सदस्यांचे तसेच श्री. जयंत गायकवाड, सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचा मी आभारी आहे.

श्री. अशोक चव्हाण, मुख्यमंत्री, श्री. छगन भुजबळ, उप मुख्यमंत्री, श्री. हर्षवर्धन पाटील, मंत्री, सांस्कृतिक कार्य व अन्य विभाग, श्री. सुरेश वरपूडकर, राज्यमंत्री सांस्कृतिक कार्य व अन्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रोत्साहानासाठी मी ऋण व्यक्त करतो.

**अरुणचंद्र शं. पाठक,**
कार्यकारी संपादक.

## प्रस्तावना

रायगड जिल्हा गॅझेटिअर हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ प्रकाशित करताना मनस्वी आनंद होत आहे. दीड-दोन वर्षे केलेल्या परिश्रमांची फलश्रुती या ग्रंथरूपाने मी अभ्यासकांसमोर ठेवीत आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भ साहित्यात बहुमोल भर घालीत आहे असा विश्वास वाटतो. वास्तविकपणे गॅझेटिअर–निर्मिती ही एक स्वतंत्र विद्याशाखा झालेली आहे. त्यामुळे गॅझेटिअरची संकल्पना स्थितिशील राहणे असंभव आहे. गॅझेटिअर म्हणजे केवळ प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, वनसंपदा व स्थळांची भौगोलिक माहिती आणि लोक, राजघराण्यांचा इतिहास, आर्थिक स्थिती, महसूल प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश नव्हे. जुनी संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरच्या कक्षा संकुचित करणे योग्य होणार नाही. नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे प्रत्येक विषयाच्या विविध पैलूंचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विवेचन करणे आवश्यक आहे. नवीन साहित्याच्या आधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य आहे. या दृष्टिकोनातून विद्यमान ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठीमधील जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील हे चौथे पुष्प.

कुलाबा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची पहिली इंग्रजी आवृत्ती जेम्स एम. कॅम्बेल या आय. सी. एस. अधिकाऱ्याने संपादित करून १८८३ मध्ये प्रकाशित केली. या आवृत्तीची उपयुक्तता लक्षात घेऊन आम्ही पुनर्मुद्रण करून अभ्यासकांना उपलब्ध करून दिली आहे (१९८९). त्यामुळे तत्कालीन इतिहास, समाजशास्त्रीय माहिती, पुरावशेष आणि जमीन महसूल प्रशासनाची उपयुक्त माहिती पुनःर्मुद्रित आवृत्तीद्वारे उपलब्ध झालेली आहे. इ. स. १८८३ चा हा ग्रंथ खचितच अभ्यासपूर्ण होता. त्याची खास विशेषता म्हणजे जातीजमातींचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून दिलेले वर्णन, पुरावशेष व स्थलवर्णने, जुने व्यापारी मार्ग आणि महसूल प्रशासनाचा इतिहास. इतके मात्र खरे की, कॅम्बेलने लिहिलेला इतिहास व पुरातत्त्वीय माहिती तत्कालीन आधारसाहित्यावर आधारलेली असल्याने त्यात बऱ्याच त्रुटी आहेत. इतिहास लिहिण्याच्या तत्कालीन प्रथेप्रमाणे त्यात केवळ राजघराण्यांचा इतिहास दिला, तथापि समकालीन सांस्कृतिक व सामाजिक स्थिती तसेच विविध सुधारणा करण्यासाठी भारतीयांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिलेली नाही.

भारत सरकारने दिलेल्या आकृतिबंधानुसार १९६४ मध्ये कुलाबा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची सुधारित आवृत्ती काढण्यात आली. या आवृत्तीमध्येदेखील जुन्या पद्धतीनुसार केवळ राजघराण्यांचा व राजकीय संघर्षाचा इतिहास दिलेला आहे. शिवाय १८८३ च्या आवृत्तीत असलेली जातीजमातींची महत्त्वाची समाजशास्त्रीय माहिती वगळण्यात आली. वस्तुत: कालाच्या ओघात पुरावशेषांच्या अभ्यासात बरीच भर पडून शिल्पावशेषांचा नव्याने अर्थ लावण्यात आला आहे. तथापि १९६४ च्या आवृत्तीमध्ये १८८३ च्या आवृत्तीतील माहिती बहुतांश जशीच्या तशी देण्यात आली. जिल्ह्याचा आधुनिक काळाचा इतिहासही देण्यात आलेला नाही.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग करून विद्यमान रायगड जिल्हा गॅझेटिअर प्रकाशित करण्यात येत आहे. इतिहास लेखन ही एक संशोधन प्रक्रिया आहे. नवनवीन संशोधन, स्वातंत्र्य आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आधुनिक काळातील भारतीयांच्या आशाआकांक्षा व त्यांनी केलेले आंदोलन यांचा परामर्श इतिहास लेखकास घेणे आवश्यकच आहे. विद्यमान रायगड गॅझेटिअरमध्ये आधीच्या आवृत्तींमधील त्रुटी भरून काढताना १८८३ चे जेम्स कॅम्बेलचे गॅझेटिअर पायाभूत मानलेले आहे. अर्थात त्यातील सर्वच माहितीची पुनरावृत्ती करणे स्थलसंकोचाने शक्य झाले नाही. स्वाभाविकपणे हा ग्रंथ पूर्वीच्या आवृत्तीचे भाषांतर अथवा रूपांतर नसून नवीन संशोधनपर लेखनाचा अंतर्भाव असलेली ही नवनिर्मिती आहे. पूर्वीच्या आवृत्तींमधील प्रकरणांची पुनर्रचना करून नवीन आकृतिबंधानुसार १२ प्रकरणे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. राजघराण्यांच्या इतिहासाबरोबर समाजाच्या सांस्कृतिक व आर्थिक स्थितीबाबत माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नवीन आधारसाहित्य, राष्ट्रीय अभिलेखागारातील अस्सल कागदपत्रे व गृह विभागातील गोपनीय अहवाल, शोध प्रबंध, नव्याने उपलब्ध झालेले अनेक शिलालेख व ताम्रपट, पुस्तके, नियतकालिके, शासकीय कार्यालयांमधून प्राप्त झालेली मूलभूत माहिती, तसेच क्षेत्रीय सर्वेक्षण व जाणकार व्यक्तींशी केलेल्या चर्चेद्वारे उपलब्ध माहितीचा समावेश विद्यमान ग्रंथात केलेला आहे. एलिफंटा, कोंडाणे, पाले, कोल, कुडा, खडसांबळे व ठाणाळे येथील पुरातन लेण्यांचा अभ्यास करून संशोधनाच्या आधारे नव्याने अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. पूर्वीच्या गॅझेटिअर ग्रंथांमध्ये अजिबात समाविष्ट नसलेल्या खडसांबळे व ठाणाळे लेण्यांचा खास अभ्यास करून त्यांची विस्तीर्ण माहिती या ग्रंथात दिलेली आहे. जगप्रसिद्ध एलिफंटा लेण्यांची अद्ययावत माहिती एका तज्ज्ञाकडून लिहून घेण्यात आली आहे. अश्मयुग, मौर्य, सातवाहन, क्षत्रप, त्रैकूटक, कोकणचे मौर्य, कलचुरी, राष्ट्रकूट, चालुक्य व शिलाहार कालखंडाचा इतिहास दिलेला आहे.

आधुनिक विचार, वैचारिक चळवळ व स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास ही या ग्रंथाची खास विशेषता आहे. रायगड जिल्ह्याने अनेक विचारवंत, साहित्यिक, पत्रकार व राष्ट्रवाद्यांना जन्म दिलेला असल्याने त्यांच्या कार्यांचा परामर्श थोडक्यात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. विद्यमान ग्रंथाची दुसरी खास विशेषता म्हणजे "लोक" आणि "संस्कृति" या विषयांवर लिहिलेली अभ्यासपूर्ण प्रकरणे. जिल्ह्यातील प्रमुख जाती व जमातींची मानववंशशास्त्रीयदृष्टया माहिती दिलेली आहे. प्रत्येक जातीच्या लोकांमधील पोटभेद, रूढी व चालीरीती याबाबतची माहिती प्रकाशित पुस्तके व अहवालांव्यतिरिक्त समक्ष सर्वेक्षणाद्वारे तपासून घेतलेली आहे. जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा, साहित्य, संगीत, नाटक व रंगभूमी, शिल्पकला आणि चित्रकलेचे विवेचन केले आहे. भूगोल, भूगर्भशास्त्र, वनसंपदा, अर्थव्यवस्था, प्रशासन, स्मारकशिल्पे व प्रेक्षणीय स्थळांची बरीच माहिती दिली आहे. माहितीची सत्यता प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे पडताळून पाहिली आहे. तरीसुद्धा काही त्रुटी अनवधानाने राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र साहित्यिक, संगीतकार रंगभूमी कलाकार व इतर कलाकारांची माहिती देताना नवोदित व्यक्तींची माहिती देणे शक्य झालेले नाही. शिवाय ग्रंथातील माहिती संकलित केल्यानंतर प्रकाशनास विलंब होत असल्याकारणाने त्यामध्ये मंदन अवधी [ Time-lag ] गेलेला आहे.

महत्त्वाच्या स्मारकशिल्पांची रंगीत व कृष्णधवल छायाचित्रे दिलेली आहेत. विस्तृत संदर्भ सूची आणि नाम व विषय निर्देश सूचीनेही ग्रंथाची उपयुक्तता वाढलेली दिसेल. मात्र जिल्ह्यातील सर्व गावांची दर्शिका १९६४ च्या आवृत्तीत दिलेली असल्याने स्थलसंकोचास्तव या आवृत्तीत देणे शक्य झाले नाही. जिल्ह्याचा नकाशा १९६४ च्या आवृत्तीतील नकाशावरून घेण्यात आला आहे.

जिल्हा गॅझेटिअर मालिकेव्यतिरिक्त राज्यस्तरावरील मालिकेत इतिहास [३ खंड], वनस्पतिशास्त्र [४ खंड], महाराष्ट्र–भूमी व लोक, भाषा व साहित्य आणि प्राणिशास्त्र या महत्त्वाच्या विषयांवरील ग्रंथ या विभागाने इंग्रजीत प्रकाशित केलेले असून "इतिहास : आधुनिक काळ" आणि "महाराष्ट्राचा भूगोल" यावरील इंग्रजीतील उर्वरित ग्रंथांचे लेखन सुरू आहे. या ग्रंथांची उपयुक्तता खचितच मोठी आहे.

या ग्रंथातील काही खास विषयांवरील लेखन डॉ. एल. बी. केणी, डॉ. कि. का. चौधरी, डॉ. वि. गो. खोबरेकर, डॉ. जी. बी. देगलुरकर, डॉ. श. बा. सावंत, डॉ. आर. एल. कोल्हे, कै. प्रा. र. पां. आगस्ते या सहयोगकर्त्या लेखकांकडून करून घेतलेले असून उर्वरित बरेच लेखन कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले आहे. सखोल संपादकीय तपासणीनंतर सर्व मजकूर

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर संपादक मंडळातील संबंधित विषयांचे तज्ज्ञ असलेल्या सभासदांनी तपासून दिला आहे. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, बहुतांशी प्रकरणांमधील माहितीचा तपशील रायगड जिल्ह्यातील अत्यंत जाणकार असे श्री. के. गो. लिमये यांनी गॅझेटिअर संपादक मंडळाचे स्वीकृत सदस्य या नात्याने तपासून दिला आहे. श्री. लिमये यांच्या तपासणीचा खास उल्लेख करणे जरूर वाटते. संपादक मंडळातील तत्कालीन सदस्यांचा ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्यच आहे :—

(१) श्री. सी. डी. सिंग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग (अध्यक्ष)
(२) डॉ. पी. आर. करमरकर
(३) डॉ. एम. के. ढवळीकर
(४) डॉ. शशिकांत कर्णिक
(५) डॉ. भालचंद्र नेमाडे
(६) श्री. द्वा. भ. कर्णिक
(७) डॉ. सुधा काळदाते
(८) डॉ. एस. आर. चिरमाडे
(९) डॉ. अ. प्र. जामखेडकर
(१०) डॉ. कि. का. चौधरी (कार्यकारी संपादक व सचिव)
(११) श्री. के. गो. लिमये

विद्यमान लेखन हे तटस्थपणे लिहिलेला इतिहास होय आणि इतिहास म्हटला की, वस्तुनिष्ठ निःपक्षपाती दृष्टी आलीच. म्हणून स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी बऱ्याच जाणकार व्यक्तींशी चर्चा करून माहिती प्राप्त केली. याकामी सक्रीय मदत करणारे श्री. दिगंबर विनायक तथा नानासाहेब पुरोहित, श्री. हरीभाऊ भडसावळे, श्री. राजाभाऊ चांदोरकर तसेच इतर अनेक जाणकारांचा ऋणनिर्देश करणे क्रमप्राप्त आहे.

विद्यमान ग्रंथाच्या संकलन व प्रकाशन प्रक्रियेमध्ये मला सहाय्य करणाऱ्या डॉ. वि. ना. गुरव, सहसंपादक [सेवानिवृत्त], श्री. शा. कृ. खिलारे, उपसंपादक [सेवानिवृत्त], श्री. प्र. नि. नारखेडे व श्री. नि. रा. पाटील, संशोधन अधिकारी यांचे आभार मानतो. तसेच सौ. मा. सु. मोदिखाने, सौ. नं. श. अळवणी [सेवानिवृत्त], सर्वश्री के. झि. राऊत, ध. जि. नावडकर, रा. र. हनवतकर, वि. बा. सांगरूळकर, ग. ना. परब, अं. रा. पवार, शा. का. मर्गज या व इतर सहायक संशोधन अधिकाऱ्यांचेसुद्धा आभार मानतो. प्रशासनिक अधिकारी या नात्याने श्री. प्र. सा. खोबरेकर यांचे सहाय्य आणि कार्यालयातील लघुलेखक, सहायक व विविध स्तरावरील कर्मचाऱ्यांनी केलेल्या मदतीचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

या ग्रंथाची छपाई उत्तम व शीघ्र गतीने करण्यासाठी श्री. प्र. शं. मोरे, संचालक; श्री. प्र. ल. पुरकर, उपसंचालक; शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने आणि श्री. देवाशिष रॉय, व्यवस्थापक व श्री. ज. शं. आयरे, सहायक व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानणे आवश्यक आहे. तसेच छायाचित्रांसाठी डॉ. अ. प्र. जामखेडकर व श्री. म. द. पाठकजी यांचेही आभार मानतो.

हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ इतिहासकार, संशोधक, अभ्यासू नागरिक आणि प्रशासकांना उपयुक्त वाटेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई

१५ ऑगस्ट १९९३

**डॉ. कि. का. चौधरी**

कार्यकारी संपादक व सचिव